# पनवेल महानगरपालिका


**वैदयकीय आरोग्य विभाग**

**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी,**

**पनवेल -४१०२०६.**

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२
वैद्यकीय आरोग्य विभाग : ०२२ – २७४५५७५१
ई-मेल : mohpmc05@gmail.com

फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
वेबसाईट: www.panvelcorporation.com


जा.क्र./पमपा/वै.आ.वि/ 2252 /सन २०२३-२४ `दिनांक:-२०/१०/२०२३

## पदभरती जाहिरात

**वाचा** :- १. मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२२-२३ नुसार मंजुर पदे

२. महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई यांचे क्र. मपवैप/ आसे/ पदभरती/ ३३६/ २०२२ दि.२१.१२.२०२२ रोजीचे पत्र.

३. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं.राआसो/मनुष्यबळ कक्ष/सुधारित पदभरती समिती /१०२६६-१०६००/२०२३ दि.२६.०४.२०२३ रोजीचे पत्र

४. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /१०६७०-११०१६/२०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्र.

५. सहाय्यक संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे जा.क्र. रानाआअ/शैक्षणिक पात्रता/ एनयुएचएम/२४००४-२४१८७/२३ दिं २४.०५.२०२३ रोजीचे पत्र.

६. मा. आयुक्त महोदयांची दि. २२.०८.२०२३ रोजीची मान्यता टिपणी.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत, पनवेल महानगरपालिकेकरिता रिक्त असलेल्या पदांची पदभरती प्रक्रियेसाठी खालील दर्शविल्याप्रमाणे निव्वळ कंत्राटी स्वरूपात करार पध्दतीने मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज पनवेल महानगरपालिका वैदयकीय आरोग्य विभाग देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -४१०२०६, येथे दिनांक २०.१०.२०२३ ते ३.११.२०२३ या कालावधीत सादर करावेत.

राष्ट्रीय नागरी अभियान अंतर्गत पनवेल महानगरपालिकेकरिता रिक्त पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचनांनुसार राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार मंजुर पदांपैकी रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात https://www.panvelcorporation.com या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येतआहे.

20-10-23

| अ क्र | पदाचे नाव | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन (प्रतिमास) रूपये. |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स (स्त्री) | SC - ३<br>ST - २<br>VJA - १<br>NTC- १<br>NTD- १<br>SBC - १<br>OBC-४<br>EWS-४<br>OPEN- ५<br>**एकुण - २२** | B.SC. Nursing / GNM with MNC Registration | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | २०,०००/- |
| २ | स्टाफ नर्स (पुरूष) | SC - १<br>VJA - १<br>OBC- १<br>OPEN- २<br>**एकुण - ०५** | B.SC. Nursing / GNM with MNC Registration | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | २०,०००/- |
| ३ | आरोग्य सेविका | SC - ५<br>ST - १<br>NTD - १<br>EWS - ८<br>OPEN — ५<br>**एकुण - २०** | ANM with MNC Registration | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | १८,०००/- |
| ४ | LHV | SC - १<br>**एकुण - ०१** | B.SC. Nursing / GNM with MNC Registration | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | २०,०००/- |
| ५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | VJA - १<br>OBC- १<br>EWS - १<br>OPEN — २<br>**एकुण - ०५** | १२ + Diploma with Maharashtra Paramedical Council Registration<br>१) DPU Dr.D.Y. Patil Vidyapeeth, pune (Deemed Univsersity) (Under Section ३ of the UGC Act, १९५६)<br>२) Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik (Established by Govt. Of Maharashtra )<br>३) Maharashtra State Board of Technical Education, ४९, Kherwadi, Bandra (E) Mumbai.<br>४) Shreemati Nathibai Damodar Thackersey, Women's University, Mumbai- ४०००४९.<br>५) Maharashtra University of Health Sciences, Nashik, India.<br>६) Tata Institute of Social Science,Devnar, Mumbai. | उच्चतम वयोमर्यादा ६५ वर्ष | १७,०००/- |

अर्जदारांच्या गुणांकनानुसार प्रवर्गनिहाय निवड सुचीमधील पात्र उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेनुसार वरील प्रसिध्द केलेल्या रिक्त पदावर त्या त्या प्रवर्गात नियुक्त्या दिल्या जातील व उर्वरीत पात्र उमेदवारांची पदनिहाय व प्रवर्गनिहाय प्रतिक्षायादया ठेवण्यात येतील. भविष्यात रिक्त होणाऱ्या पदावर या पदनिहाय /

20-10-23

प्रवर्गनिहाय प्रतिक्षायादया मधील उमेदवारांमधुन त्यांच्या गुणवत्ते प्रमाणे उमेदवारांना नियुक्ती दिली जाईल. सदर प्रतिक्षायादीचा वैधता कालावधी निवड यादी प्रसिध्द केल्यापासुन केवळ १ वर्ष राहिल.

**अर्जदाराची वयोमर्यादा-**

१. अर्ज भरण्याच्या दिनांकास उमेदवाराचे वय जाहिरातीमध्ये विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.

२. मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दि. २५ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार रूग्ण सेवेशी संबंधित इतर पदांची वयोमर्यादा ६५ वर्ष राहील. वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन प्राप्त केलेले शारिरीक दृष्टया व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

**अर्ज भरण्या बाबतच्या सुचना-**

१. उमेदवाराने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणे अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

२. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीख अर्जात अचुक नमूद करावी.

३. जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष )अचूक नमुद करावे.

४. अर्जदार ज्या पदासाठी अर्ज करत आहे त्या पदाचे नाव विहित नमुन्यातील अर्जावर सुस्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे.

५. अर्जात उमेदवाराचे लिंग व वैवाहिक दर्जा या बाबतची माहिती नमूद करावी.

६. महिला अर्जदार विवाहित असल्यास, व त्यामुळे त्यांच्या नावात बदल झाला असेल तर **विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Registration Certificate)** किंवा नावात बदल झाल्यामुळे (Govt. Gazette) मध्ये असा बदल जाहिर केल्याचे शासकीय राजपत्रामधील (Govt. Gazette) अर्जदाराचे नाव असलेल्या पानाची स्वयंम - साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

७. अर्जामध्ये उमेदवाराने स्वत:चा वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे.

८. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.

९. उमेदवाराने अर्जामध्ये आपला जात, धर्म हा तपशील अचूकपणे नमूद करावा.

१०. इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, या प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी अर्जासोबत त्यांचे जात-प्रमाणपत्र/ जात वैधता प्रमाणपत्र व वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

११. अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरूपी पत्ता तसेच ई- मेल व मोबाईल नंबर अर्जामध्ये अचूक नमूद करावा.

१२. अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा, याबाबतचे अर्जासोबतचे विहित नमुन्यातील अर्जदाराने स्वाक्षरी केलेले हमी पत्र सादर करावे. अर्जासोबत या हमीपत्राचा नमुना देण्यात आलेला आहे.

१३. अर्ज विहित नमुन्यात टंकलिखीत / स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**शैक्षणिक अर्हता/पात्रता-**

१. अर्जामध्ये शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.

२. अर्जदारानेकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता असणे आवश्यक आहे.

३. अर्ज भरत असताना पात्रता परिक्षेत मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुण व गुणांची टक्केवारी, अर्जातील नमुद टक्केवारीसी न जुळल्यास, असे अर्ज नामंजूर करण्यात येतील. ग्रेड किंवा श्रेणी यांचे रूपांतर गुणांच्या टक्केवारीमध्ये करण्यासाठी आवश्यकता भासल्यास अर्जदाराने त्यांचे महाविद्यालय किंवा विद्यापिठ यांचे सहकार्य घ्यावे.

४. अर्जदारांनी अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिकेची छायांकित स्वसाक्षांकित प्रत व इतर आवश्यक ती प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.

५. पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त शिक्षण मंडळ, शैक्षणिक संस्था शिक्षण परिषदा विद्यापीठ यामधुतनच प्राप्त केलेली असणे बंधनकारक आहे..

६. अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल. त्यामुळे ही माहिती अपुरी किंवा चुकीची असु नये याची खबरदारी अर्जदाराने घ्यावी.

20.10.23

**अनुभव –**

१. शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा शासकीय व निम शासकीय संस्थांमधील केवळ संबंधीत क्षेत्रातील अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करू नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.

२. अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना अर्जदाराने शासकीय व निम शासकीय संस्थेच्या अनुभव प्रमाणपत्रामधील दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर अनुभवाचा कालावधी अनुभव -प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्यांची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.

३. ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**संगणक अर्हता-**

१. MS - CIT प्रमाणपत्र किंवा तत्सम पात्रता धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा..

**लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र-**

१. लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासुन लागू करण्यात आली असून दि.२३/०७/२०२०. पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

२. विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अर्जदाराने अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे..

**अर्ज शुल्क -**

१. अर्जदाराने अर्जासोबत अर्ज शुल्कासाठी कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१००/- असे अर्जाचे शुल्क राहिल. त्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष पुढील नावे काढावा .

" INTEGRATED HEALTH AND FAMILY WELFARE SOCIETY PANVEL"

२. राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षा व्यतिरिक्त इतर कोणत्याही बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही. धनाकर्षा शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. असे अर्ज अपात्र करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

20-10-23

**उमेदवारांचा फोटो व स्वाक्षरी-**

१. उमेदवाराने अर्जावरील फॉर्म वर फोटोकरीता राखीव ठेवलेल्या जागेवर त्यांचा अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.

२. अर्जदाराने स्वाक्षरी साठी राखीव ठेवलेल्या जागेत स्वाक्षरी करावी.

**निवड प्रक्रिया-**

या निवड प्रक्रियेसाठी मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /१०६७०-११०१६/२०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचना पुढील प्रमाणे :-

१. सदर पदभरतीच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या अर्जदारांच्या अर्जामधील गुणवत्तेनुसार / गुणांकन पद्धतीने निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. या संदर्भात सर्व अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती यांच्याकडे राखून ठेवले आहेत.

२. उमेदवाराची निवड शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार गठित करण्यात आलेल्या निवड समिती च्या मान्यतेने मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि.१७/०३/२०२२ रोजीच्या पत्रातील निकषानुसार १:३ व १:५ उमेदवारांची निवड गुणांकन पद्धतीने करण्यात येईल. उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन पदवी/ पदविका परीक्षेतील अंतिम वर्षाचे गुण. अतिरिक्त अर्हता, अनुभव विचारात घेऊन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

**गुणांकन पद्धती खालीलप्रमाणे:-**

| अ.क्र | विवरण | तपशील | अधिक्तम गुण |
|---|---|---|---|
| १ | पदासाठी आवश्यक Qualifiying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारी ५० प्रमाणे Propottion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion= ६०*५०/१००=३०)<br>[ अधिकतम ५० गुण ] | ५० गुण |
| २ | पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेपक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | [ अधिकत्तम २० गुण ]<br>मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Propottion काढावे. (उदा. अतिरिक्त शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Propottion = ६०*२०/१००=१२ गुण) | २० गुण |
| ३ | संबंधित पदाशी निगडित अनुभव | प्रत्येक वर्षासाठी ६ गुण द्यावेत.<br>(१ वर्षाकरिता ६ गुण या प्रमाणे जास्तीत जास्त ३० गुण देता येतील) | ३० गुण |
| | | | एकुण १०० गुण |

३. मा. सहसंचालक (अतांत्रिक) राआअ, मुंबई यांच्या दि. २०.०७.२०१६ रोजीच्या पत्रानुसार बिंदुनामावली नुसार राखीव प्रवर्गास अनुसरून पदभरती जाहीरात दिल्यानंतर पुढील प्रक्रियेद्वारेअपेक्षित राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध् न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन ११ महिने कालावधीसाठी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या, खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १३/०८/२०१४ व दि. १९/१२/२०१८ च्या शासननिर्णयानुसार पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल

५. सदरील गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येणार असुन त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश Mail द्वारे / टपालाद्वारे निर्गमित करण्यात येतील.

६. गुणांकन पद्धतीनुसार भरण्यात येणाऱ्या पदांकरिता कोणत्याही प्रकारची मुलाखत घेण्यात येणार नाही.

७. समान गुण प्राप्त झाल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल तसेच उमेदवारांचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडित अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

८. गुणांकन पद्धतीने निवड झालेल्या उमेदवारांची **निवड यादी** व निवडीस पात्र असलेल्या उमेदवारांची **प्रतिक्षा-यादी** पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

९. सदर ई-मेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहील व त्यासाठी ई-मेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

**सर्वसाधारण सुचना-**

१. सदर पदभरती प्रक्रिये बाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी www.panvelcorporation.com या संकेस्थळास वेळोवेळी भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे याची जबाबदारी संबंधीत अर्जदाराची राहिल. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

२. जाहीरातीत नमूद केलेले पद हे पूर्णत: कंत्राटी स्वरुपाचे असून ते राज्यशासनाचे नियमित पद नाही, या पदाचा राज्य शासनाच्या पदाशी काहीही संबंध नसून उमेदवार भविष्यात राज्य शासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करु शकणार नाही.

३. जाहीरातीत नमूद केलेल्या पदाचे वेतन हे **एकत्रित मासिक ठोक मानधन** आहे.

४. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर सुट्टीचे दिवस वगळुन ७ दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी सेवे मध्ये रूजु होणे अनिवार्य राहिल. उमेदवाराने निवडीसाठी कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल, अन्यथा त्याची नियुक्ती संपुष्टात आणुन, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

५. अर्ज भरताना अराखीव प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांनी अर्जा सोबत खालील (१ ते १४) कागदपत्रे जोडावीत व राखीव प्रवर्ग (अजा, अज, भजक, वि.जा, इमाव, विमाप्र व इडब्लुएस) उमेदवारांनी अर्जा सोबत खालील (१ ते १७) कागदपत्रे जोडावीत.

वरील पदांसाठी संकेतस्थळावरील विहित नमुन्यातील अर्ज व त्या संबंधीची कागदपत्रे वरील अटी व शर्तीनुसार पनवेल महानगरपालिका, आरोग्य विभाग, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१०२०६ (शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन) या पत्त्यावर दिनांक २०.१०.२०२३ ते ०३.११.२०२३ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायं ४.०० वाजेपर्यत सादर करावेत. विहित मुदतीत टपालाने, कुरीअरने व Email - nuhmpmc२०२३@gmail.com द्वारे अर्ज स्विकारले जातील.

**<u>अर्जदाराने त्यांच्या विहित नमुन्यातील पुर्ण माहिती भरलेल्या अर्जासोबत खालील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.</u>**

१) वयाचा पुरावा

२) शैक्षणिक अर्हतेसंबंधी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे - उदा. पदवी/पदविका प्रमाणपत्र (Diploma / Degree Convocation )

३) पात्रता परिक्षेची गुणपत्रिका (सर्व वर्षांच्या गुणपत्रिका)

४) महाराष्ट्र नर्सिग कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (स्टाफ नर्स, आरोग्य सेविका, LHV) तसेच प्रयोगशाळा तंत्रज्ञ उमेदवाराचे महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र अनिवार्य

५) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे

६) आधारकार्डची झेरॉक्स प्रत शिवाय PAN Card उपलब्ध् असल्यास, त्याची झेरॉक्स प्रत

७) सध्याचा फोटो (२ प्रती)

८) महिला अर्जदार विवाहित असल्याने जर तिच्या नावात बदल केला असेल तर विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Registration Certificate) **व / किंवा** असा नावात बदल केल्यामुळे राजपत्रामध्ये (Govt. Gazette) असा बदल प्रसिध्द झालेल्या अर्जदाराच्या नावाचा उल्लेख असलेल्या पानाची झेरॉक्स प्रत.

९) पुरुष उमेदवाराच्या बाबतीत जर नावामध्ये काही कारणामुळे बदल केलेला असेल तर अशा नावातील बदलासाठी शासनाच्या राजपत्रात तसे जाहीर केले असलेल्या व ज्या पानावर उमेदवाराच्या नावाचा उल्लेख आहे त्या पानाची झेरॉक्स प्रत.

१०) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)

११) अर्जदारावर फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र

१२) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

१३) राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) - State Bank of India, Punjab National Bank, Bank of Baroda, Canara Bank, Union Bank of India, Bank of India, Indian Bank, Central Bank of India, Indian Overseas Bank, UCO Bank, Bank of Maharashtra, Punjab & Sindh Bank या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही बँकेचा धनाकर्ष स्विकारला जाणार नाही.

१४) MS – CIT Certificate किंवा तत्सम परिक्षा उतिर्ण असल्याचे प्रमाणपत्र. किंवा यासाठी सुट(Exemption) मागणाऱ्याच्या बाबतीत आवश्यक पुष्ठयर्थ कागदपत्रे.

१५)जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र,नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, EWS प्रमाणपत्र ज्या ज्या प्रवर्गातील अर्जदारास लागु आहे त्या प्रमाणे राखीव प्रवर्गातील उमेदवाराने सादर करणे अनिवार्य आहे.

१६) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (अजा, अज प्रवर्ग वगळुन इतर राखीव प्रवर्गातील) उमेदवारांनी सादर करणे अनिवार्य आहे.

१७) EWS प्रवर्गासाठी महाराष्ट्र शासनाने विहित केलेल्या नमुन्यात त्या बाबतीतील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र जोडावे.

**सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकते नुसार बदल करण्याचे व सदर पदभरती अंशतः किंवा पूर्ण रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, निवड समितीने राखून ठेवले आहेत. कृपया याची अर्जदारांने नोंद घ्यावी.**

20-10-23

(डॉ.आनंद गोसावी)
**वैदयकीय आरोग्य अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

अर्जाचा नमुना

( ______________________________ या पदासाठी अर्ज )

उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी ३.५ से.मी व उंची ४.५. से.मी) आकाराचा फोटो चिकटवून स्वत: साक्षांकीत करावा

प्रति,
मा.आयुक्त
पनवेल महानगरपालिका

१. संपूर्ण नाव :------------------------------------------------

(प्रथम आडनाव )

२. वडिलाचे / पतीचे नाव :------------------------------------------------

३. सद्या राहण्याचा पत्ता :------------------------------------------------

------------------------------------------------

४. भ्रमणध्वनी क्रमांक :(१)------------------------------(२)----------------------

५. जन्मतारीख :------------------------ दिनांक : / /२०२३ रोजीचे वय ----------

राष्ट्रीयत्व ------------------

६. उमेदवार विवाहीत / अविवाहित :------------------------------------------------

७. (अ ) जात :--------------------------------- (ब) जात वैधता प्रमाणपत्र : आहे/ नाही.

८. धर्म :----------------------------------------------------------------

९. ई- मेल आयडी :----------------------------------------------------------------

१०. शैक्षणिक अर्हता :-

जसे B.SC. Nursing / GNM, ANM, DMLT

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)

११. अतिरिक्त अर्हता :-जसे पदवीत्तर

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षांचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)

१२. अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्षे | सेवा सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(प्रमाणपत्राच्या प्रती)

१३. अवगत असणाऱ्या भाषा :

| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| बोलणे | | | |
| लेखन | | | |

१४. आपणा विरुद्ध न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालु आहे काय ?(असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा)

१५. अर्जासोबत खालील छायांकित सत्य प्रती जोडलेल्या आहेत. (जात वैद्यता प्रमाणपत्र व स्त्री उमेदवारांनी विवाहानंतर नावात बदल झाला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ नावात बदल झाल्याचे राजपत्र जोडणे बंधनकारक आहे.)

| | |
|---|---|
| १. | २ |
| ३. | ४. |

१६. वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असनु ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुद्ध कायदेशिर कारवाई होईल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

(अर्जदाराची स्वाक्षरी व नाव )

# फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे

# हमीपत्र

मी.श्री./श्रीमती/कुमारी...........................................................................................................

वय................ वर्ष..............................सध्या राहणार असे लिहुन देते/देतो की, या पत्यावर

.................वर्षापसून आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझेविरुद्ध मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काहीएक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

सही/-

# प्रतिज्ञापन

# नमुना अ

मी. श्री. /श्रीमती / कुमारी,..............................................................................................................

.....................श्री. ..............................................................................................................................

यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय............................वर्ष,

राहणार...........................................................................

या द्वारे असे जाहिर करतो / करते की,

(१)मी..............................................................................................................................या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ............................ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि. २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या आहे. ( असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)

(३) दिनांक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

सही/-

दिनांक :-